ISBN 978-93-5780-325-0



रयत शिक्षण संस्थेचे,

# बळवंत कॉलेज, विटा

ता. खानापूर, जि. सांगली

अर्थशास्त्र विभाग आयोजित

# शिवार्थ

## स्मरणिका 2023

- कुक्कुटपालनाचे अर्थशास्त्र
- आभासी चलन भास, आभास आणि वास्तव

३३ वे

शिवाजी युनिव्हर्सिटी
इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर (सुयेक)

## वार्षिक अधिवेशन

रविवार, दि. २६ फेब्रुवारी, २०२३

 ISBN: 978-93-5780-325-0


| | | | |
|---|---|---|---|
| 20 | Dr. S. T. Kombde*<br>Lalita Dattatray Jagtap** | Role Of Women In The Development Of Poultry And Livestock Sector | 129-134 |
| 21 | Dr. S. T. Kombde*<br>Dr. D. R. Nanaware** | Analysis Of Production And Export Performance Of Indian Poultry Industry | 135-144 |
| 22 | Dr. Satish Vyavahare | Growth And Development Of Poultry Production In India | 145-153 |
| 23 | प्रा (डॉ) एम. एस. देशमुख | जागतिक कुक्कुटपालन व्यवसायाची सद्यस्थिती व भारताचे योगदान | 154-160 |
| 24 | गणेश आदिनाथ टेकळे | कुक्कुटपालन व्यवसायाचे व्यवस्थापन | 161-164 |
| 25 | प्रा. खराडे निकिता सुनिल | कुकुट पालन आणि व्यवस्थापन चिकित्सक अभ्यास | 165-168 |
| 26 | प्रा. डॉ. प्रशांत फडणीस, | कुक्कुट पालन आर्थिक व सामाजिक विकास आणि वस्तुस्थिती पाटण तालुका | 169-172 |
| 27 | प्रा. डॉ. जे. एस. इंगळे | कुक्कुट पालन व्यवसायातील अंडी व मांस उत्पादन,उपभोग आणि निर्यात : समस्या व उपाय | 173-184 |
| 28 | हेमलता हरिभाऊ पाटील | कोकणातील (रायगड जिल्हातील )कुक्कुटपालन आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण | 185-192 |
| 29 | प्रा.डॉ. बाळासाहेब कोंडीबा माने | कुक्कुटपालन : ग्रामीण विकासातील महत्त्व | 193-201 |
| 30 | प्रा. डॉ. शंकर पांडूरंग हजारे | कुक्कुटपालनाचे अर्थशास्त्रय | 202-207 |
| 31 | डॉ. धेडे डी. आर. | "कोंबडयांच्या विविध जातींचा अभ्यास" | 208-216 |
| 32 | कु. यास्मीन हारुण मुल्ला | "हेरवाड गावातील बाणदार पोल्ट्री फार्मचा आर्थिक अभ्यास" | 217-222 |
| 33 | राजगुरू रितुजा अरुण*<br>बिचकर पुष्पेंद्र रामचंद्र** | कुकुटपालन व्यवसाय व्यवस्थापन | 223-229 |
| 34 | कुंभार प्राजक्ता शामसुंदर | कुक्कुटपालन व्यवसायातील नवे प्रवाह | 230-236 |
| 35 | प्रा.किरण तानाजी यादव | कुक्कुटपालन आणि ग्रामीण महिला सबलीकरण | 237-239 |
| 36 | स्वप्नाली गोरे | फायद्याचा जोडधंदा : कुक्कुटपालन | 240-241 |
| 37 | नेहा संजय साळुंखे | ग्रामीण भागातील कुक्कटपालनाचा विकास | 242-242 |
| 38 | Dr. Asmita Pradhan | कुक्कुटपालन आणि महिला सबलीकरण | 243-248 |
| 39 | डॉ. रमजान फत्तुखान मुजावर | भारतातील कुक्कुटपालन व्यवसाय | 249-255 |
| 40 | डॉ. संतोष मोटेगावकर*<br>कु. स्मिता भिवा रणदिवे** | कुक्कुटपालनाचे अर्थशास्त्र | 256-259 |
| 41 | डॉ. सोमनाथ विष्णु काळे, | भारतातील पोल्ट्री उत्पादन : एक दृष्टीक्षेप | 260-262 |
| 42 | डॉ.शेडगे दत्तात्रय भगवानराव | कुक्कुटपालन एक रोजगारवर्धकउद्योग व्यवसाय | 263-275 |
| 43 | सोनाली शंकर साळुंखे. | "गिरीराज कुकूटपालन स्वयंरोजगाराचे साधन" | 276-277 |
| 44 | फरदीन फारूक जमादार*<br>प्राजक्ता जयवंत पोळ** | परसातील कुक्कुटपालन - फायदेशीर जोड व्यवसाय | 278-281 |
| 45 | जयमाला अर्जुन उथळे | भारतातील कुक्कुटपालन व्यवसायाच्या संभाव्यता आणि समस्या | 282-284 |
| 46 | प्राचार्य डॉ. डी. के. पाटील. | ग्रामीण रोजगार निर्मितीत गावरान कोंबडी पालन आणि अंडी उत्पादनाचे योगदान | 285-293 |
| 47 | प्रा. प्रकाश शिंदे | भारतीय अर्थव्यवस्थेत कुक्कुटपालन या उद्योगाची भूमिका | 294-297 |
| 48 | प्रा. डॉ. प्रकाश यशवंत बुरुटे | कुक्कुटपालन व्यवसाय: अर्थार्जनाची संधी | 298-302 |
| 49 | प्रा. डॉ. भोगे दिगंबर भागवत | भारतीयों कुक्कुटपालनाची जागतिक स्पर्धाक्षमता | 303-307 |
| 50 | प्रथमेश रावसाहेब काटकर | ग्रामीण विकासातील कुक्कुटपालनाची भूमिका | 308-310 |

 ISBN: 978-93-5780-325-0

# कुक्कुटपालन एक रोजगारवर्धकउद्योग व्यवसाय

**डॉ.शेडगे दत्तात्रय भगवानराव,**

*सहाय्यक प्राध्यापक, प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर ता.कोरेगाव, जि.सातारा*

***गोषवारा :***

संशोधन पेपरच्या माध्यमातून देशातील कुक्कुटपालन उद्योग व्यवसाय देशातील बेरोजगारांना किती, कशा आणि कुठे संधी आहेत हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधन अभ्यासातील गृहीतकानुसार व प्राप्त तथ्य विश्लेषणातून असे लक्षात येते की, राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय स्तरावर दिवसेंदिवस वाढत असलेली मांस आणि अंड्याची मागणी पुरविण्यासाठी भरतात विशेषतः ग्रामीणभागामध्ये प्रचंड क्षमता आहे. यामुळे देशाला मोठ्याप्रमाणात परकीय चलन मिळवून देण्यामध्ये कुक्कुटपालन व्यवसाय विशेष महत्वाचा ठरू शकतो. भारतातील पोल्ट्री उत्पादनात आयातीपेक्षा निर्यात जास्त आहे. या पेपरमधून कुक्कुटपालन क्षेत्राच्या वाढीच्या आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत महिलांचा लाभदायक सहभाग, उत्पादकता, उत्कृष्टता आणि स्पर्धात्मक फायद्यासाठी महिलांना संस्थात्मक, कायदेशीर आणि तांत्रिक बदलांमध्ये सामावून घेणे कसे शक्य आहे हे स्पष्ट होते. तसेच देशातील एकूण पोल्ट्री उद्योग व्यवसायात रोजगार निर्मिती आणि ग्रामीण उत्पन्न वाढवण्यामध्ये पोल्ट्री क्षमता काय आहे हेही स्पष्ट होते. पेपरमध्ये उपलब्ध आकडेवारीनुसार देशातील अंडी व मांस उत्पादन आणि दरडोई उपलब्धतेत असलेली स्थिती तसेच राज्यांमधील तुलनात्मक स्थिती लक्षात येते. तसेच कुक्कुटपालन व्यवसायाच्या वाढीसाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी काही योजना कार्यान्वित केल्या आहेत त्यांची परिणामकारकता दिसते. अंतरराष्ट्रीय बाजारात अंडी आणि मांस उत्पादनाची मागणी किती आहे आणि ती पूर्ण करण्यासाठी कोणत्या क्षमता विकसित कराव्या लागतील हे स्पष्ट होते. कुक्कुट मांस आणि अंडी याचे लोकांच्या आहारात किती महत्वाचे आहे हे स्पष्ट करण्यासाठी विविध संदर्भ अभ्यासल्यानंतर अन्न सुरक्षेसाठी वाढणारी मानके, कमी आणि मध्यम-उत्पन्न असलेल्या देशांसाठी आव्हाने आणि संधी काय आहेत हे स्पष्ट होते. पेपरच्या निष्कर्षाप्रत आल्यानंतर दिसून येते की, चांगला विकासदर असूनही देशातील बेरोजगारीच्या या स्थितीमागचं एक प्रमुख कारण हे पूर्वीच्या कृषी आधारित अर्थव्यवस्थेकडून सेवा आधारित अर्थव्यवस्थेकडे होणारं स्थित्यंतर हे आहे. देशामध्ये बेकारी कमी करण्यासाठी रोजगार प्रमुख्याने ग्रामीण भागात शेतीला आणि शेतीलगतच्या जोडधंद्यांना उत्तेजन द्यावे लागेल. ग्रामीण भागातील 'कुक्कुटपालन' आणि 'पशुपालन' यासारखे व्यवसाय रोजगार निर्मिती करण्याबरोबरच उत्पन्न वाढीचे प्रमुख स्रोत उपलब्ध आहेत. देशात आणि जगामाध्येही प्रचंड प्रमाणामध्ये अंडी आणि मांस याची मागणी आहे. या दृष्टीकोनातून भारतामध्ये कुक्कुटपालनाच्या व्यवसायाला महत्व देणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना:**

भारतामध्ये बेरोजगारी आणि गरिबी प्रचंड प्रमाणात आहे, हे जितकं वास्तव आहे तितकेच हेही वास्तव स्वीकारायला हवे की, भारताच्या विकासाकरिताअनेक संधी असताना सुद्धा त्याकडे विशेषत्वाने दुर्लक्ष झाल्याने आज पर्यंत बेरोजगारीवर हमखास आणि दूरगामी उपाय निघू शकला नाही.देशातील संसाधनांचा पूर्ण क्षमतेने वापर करून अर्थव्यवस्था पूर्ण रोजगाराच्या स्थितीकडे घेवून जाने म्हणेजे विकास, असेअर्थशात्रीय सूत्र सांगते.ग्रामीण भागामध्ये अनेक संसाधने व त्यांच्या क्षमता पूर्णपणे वापराबाबत आणखी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील 'कुक्कुटपालन' आणि 'पशुपालन' यासारखे व्यवसाय रोजगारनिर्मिती करण्याबरोबरच उत्पन्न वाढीचे प्रमुख स्रोत उपलब्ध आहेत.देशात आणि जगामाध्येही प्रचंड प्रमाणामध्ये अंडी आणि मांस याची मागणी आहे.या दृष्टीकोनातून कुक्कुटपालनाच्या उपक्रमांकडे व्यवसायिक पद्धतीने पाहणे आवश्यक आहे.म्हणूनच राज्याच्या आणि देशाच्या विकासाकरिता प्रमुख्याने ग्रामीण विकासाकरिता कुक्कुटपालना सारख्या व्यवसायाकडे अतिशयप्रगल्भतेने पाहण्याची आवश्यकता आहे.

देशाच्या पर्यायाने खेड्यांच्या विकासासाठी नियोजनपूर्वक कृती आराखडा तयार केला पाहिजे.खेड्यांच्या विकासातील कृती आराखड्यात ग्रामीण भागातील रोजगाराभिमुख व्यवसाय व उद्योगांना समाविष्ट करणे आवश्यक आहे. पशुपालन व कुक्कुटपालन यासारख्या व्यवसायाने ग्रामीण रोजगारामध्ये आणि उत्पन्न वाढीमध्ये प्रचंड योगदान दिले आहे. देशातील लोकांच्या पोषक अन्नघटकांचा पुरवठा करणारा व्यवसाय म्हणून शेतीपूरक अशा कुक्कुटपालन व्यवसायासाठी देशात आणि जगभरात उपलब्ध असलेल्या प्रचंड संधी रोजगारात परावर्तीत करण्यासाठी यथोचित प्रयत्न होणे आवश्यक आहे. अर्थप्राप्ती व पोषणासाठी कुक्कुटपालन व्यवसायातील संधी ग्रामीण विकासासाठी अर्थसंजीवनी ठरू शकते हे या अभ्यासातून आपण पाहणार आहोत.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये:**

१. कुक्कुटपालन व्यवसायाची देशातील स्थिती अभ्यासणे

२. कुक्कुटपालन व्यवसायाचे महत्व अभ्यासणे

३. कुक्कुटपालन व्यवसायातील संधी अभ्यासणे

४. जीवन अर्थपोषण म्हणून कुक्कुटपालन उद्योग व्यवसाय पर्याय होवू शकतो काय? याचा अभ्यास करणे

**गृहीतके:**

१. कुक्कुटपालन व्यवसाय अर्थव्यवस्थेतील एक महत्वपूर्ण व्यवसाय आहे.

२. कुक्कुटपालन व्यवसायात रोजगार व उत्पन्न वाढीच्या मोठ्या संधी आहेत.

३. ग्रामीण विकासामध्ये कुक्कुटपालन व्यवसायाचे अमुलाग्र योगदान आहे.

**संशोधन पद्धती:**

संशोधन अभ्यास विषयासाठी दुय्यम माहिती स्त्रोतांचा आधार घेवून उपलब्ध तत्थ्य संकलनाचे पृथक्करण करून निघणारे निष्कर्ष स्पष्ट करणे आणि परिस्थितीक बदलांसाठी योग्य त्या उपायात्मक शिफारशी निर्धारित करणे.

**ग्रामीण भागाच्या विकासाची आवश्यकता:**

खेड्याकडे चला हा महात्मा गांधीजींनी दिलेला मूलमंत्र आजही तितकाच योग्य व कालसंगत आहे. परंतु, खेड्यांचे वास्तव विचारात घेतल्यास असे दिसते की, रोजगाराच्या शोधात दररोज लोकांचे लोंढेच्या लोंढे शहराकडे वाहताना दिसतात. गांधीजीचा हा मूलमंत्र वैचारिकदृष्ट्या फक्त कागदावरच राहिल्याचे पहावयास मिळते.

आपण थोड्या प्रगल्भ विचारानेआणिउघड्या डोळ्याने आपल्या गावाकडे, इथे असलेल्या नैसर्गिक संसाधनांकडे पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, ग्रामीण भागात सुध्दा उद्योगाच्या, व्यवसायाच्या, स्वयंरोजगाराच्या अनेकविध संधी उपलब्ध आहेत. परंतु आपण कधी त्यांच्यांकडे शाश्वत संधी म्हणून गांभीर्याने पाहिलेच नाही. ग्रामीण विकासात शेती आणि शेतीपूरक असलेल्या दुग्ध व्यवसायाबरोबर कुक्कुटपालनाला विशेष महत्व राहिलेले आहे.

भारताच्या लोकसंख्येपैकी जवळपास ६८.८% लोकसंख्या (२०११च्या जनगणनेनुसार) आजही खेड्यात राहते. भारतीय लोकसंख्या ही तरुण लोकसंख्या हे वरदान असले तरी तरुणांच्या हाताला काम देणे हे एक मोठे आव्हान आहे. या वाढत्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देणे, लोकांना अन्नधान्य पुरविणे, मोठ्या लोकसंख्येमुळे व्यवस्थेवर येणारा ताण या गंभीर समस्यांचे आव्हान दिवसेंदिवस वाढत आहे. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी अन्य व्यवसाय व उद्योगधंदे वाढविण्याची गरज आहे. अशाच व्यवसाय व उद्योगधंद्यात पशुपालन आणि कुक्कुटपालन यांचा समावेश होतो.

**कुक्कुटपालन व्यवसायाचे अर्थशास्त्रीय महत्व :**

भारताच्या ग्रामीण भागामध्ये दुग्ध व्यवसायानंतर प्रचलित असलेला आणि तितकाच महत्वाचा जोडधंदा म्हणून केला जाणारा आणि गावांमध्ये स्वतंत्र व्यवसाय म्हणून विशेषत्वाने वाढत असलेला कुक्कुटपालन हा महत्वाचा व्यवसाय आहे. रोजगार वाढीबरोबर लोकांच्या पोषक अन्नघटकांच्या पुर्ततेतून आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारा कुक्कुटपालन व्यवसाय कमी भांडवलात, कमी जागेत आणि कमी मनुष्यबळ यामध्ये सुरू करणे शक्य आहे.कुक्कुटपालन व्यवसायातून प्रचंड प्रमाणात निर्यातही वाढू शकते.

ग्रामीण भागात पीढ़ीजात घरोघरी महिला ५-१०कोंबड्या सांभाळून त्यापासून उच्च प्रथिनयुक्त अंडी अणि चिकन आपल्या कौटुंबिक गरजेपुरते मिळवतात. परंतु व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव, योग्य मार्गदर्शनाचा अभाव,तसेच जागेची आणि

 ISBN: 978-93-5780-325-0

भांडवलाची कमतरता यामुळे त्यांची संख्या मर्यादित राहिली. कुक्कुटपालन व्यवसायाला आधुनिकतेची जोड देवून आपण शहरांत माल पोचवू शकतो आणि अशा प्रकारच्या पारंपरिक व्यवसायाला रोजगाराच्या संधीत परावर्तीत करू शकणारा व्यवसाय बनवू शकतो.

**कुक्कुटपालन व्यवसायाचे महत्व स्पष्ट करणारे आणखी महत्वाचे घटक पुढीलप्रमाणे....**

१. कोंबड्यांची अंडी आणि मांस हे दोन्हीही प्रथिनांसारख्या आवश्यक द्रव्यांचा स्त्रोत आहेत, आणि मांसाहारी लोकांच्या आहाराची बरीच मोठी गरज हा व्यवसाय भागवू शकतो. विशेषतः हरित क्रांतीच्या मर्यादा आणि वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज विचारात घेता, पर्यायी अन्न उपलब्ध करून देणारा हा व्यवसाय महत्वाचा ठरतो.

२. छोटे भूधारक, शेतमजूर आणि इतर लोकांसाठी हा व्यवसाय पूरक उत्पन्नाचे चांगलेसाधन पुरवितो. स्वयंरोजगारासाठी सुद्धा महत्वपूर्ण ठरू शकतो.

३. इतर पूरक व्यवसायांच्या तुलनेत या व्यवसायाला बरीच कमी जागा आणि भांडवल लागते; त्यामुळे गरीब कुटुंबांसाठी तो उत्पन्नाचा आधार बनू शकतो.

४. विशिष्ट/ विशेष भौगोलिक स्थिती किंवा हवामान न लागणारा हा व्यवसाय कोठेही सुरू करता येतो.

५. या व्यवसायाची वाढ वेगाने होत असल्याने त्यात गुंतविलेले भांडवल जास्त काळ अडकून पडत नाही. आणि उत्पन्नाचा प्रवाह लवकर सुरू होतो.

६. कुक्कुटपालनात चालू भांडवलाची अडचण फारशी उद्भवत नाही कारण कोंबड्यांना लागणारे खाद्य (भरड धान्ये, कोंडा वगैरे) खेड्यांमध्ये उपलब्ध असते व त्यासाठी येणारा खर्च विशेष नसतो. ७. विचारपूर्वक गुंतवणूक केल्यास हा व्यवसाय वर्षातील सर्व काळ उत्पन्न मिळवून देऊ शकतो.

८. कुक्कुटपालनाच्या क्षेत्रात अनेक सुधारणा झाल्या आहेत. त्यांचा विचार करता हा व्यवसाय स्वतंत्रपणे सुरू करून वाढत्या लोकसंख्येच्या मागणीनुसार विकसित करता येऊ शकतो. म्हणजे एक पूरक व्यवसाय म्हणून आणि स्वतंत्र प्रकल्प म्हणूनही तो अतिशय उपयुक्त आहे.

९. अंतरराष्ट्रीय स्तरावर दिवसेंदिवस वाढत असलेली मांस आणि अंड्याची मागणी पुरविण्यासाठी भरतात विशेषतः ग्रामीणभागामध्ये प्रचंड क्षमता आहे. यामुळे देशाला मोठ्याप्रमाणात परकीय चलन मिळवून देण्यामध्ये कुक्कुटपालन व्यवसाय विशेष महत्वाचा ठरू शकतो.

ग्रामीण भागातील लोकांना आपल्या घराशेजारी किंवा परसदारात देशी कुक्कुटपालन करणे सहज शक्य होते. देशी कुक्कुटपक्षाला विलायती/विकसित हायब्रीड कुक्कुटपक्षापेक्षा रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. याशिवाय सहज उपलब्ध होणारे खाद्य उदा. किडे-मुंग्या, भरड धान्य, कचरा यामधून देशी कुक्कुटपक्षी सहज पोसले जातात. ग्रामीण भागात बहुतेक कुटुंबांकडे १०-२० कोंबड्या परसदारी पाळल्या जातात. त्यातून दररोजचीअंडी आणि मांस उत्पादनातून महिन्याकाठी २०००/- ते २५००/- रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. हाच व्यवसाय थोड्या मोठ्याप्रमाणात केल्यास शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी प्रभावी पर्याय होवू शकतो. याशिवाय योग्य मार्गदर्शनाने व शासकीय योजनांच्या मदतीने परसदारातील कुक्कुटपालन ग्रामीण भागासाठी अर्थसंजीवणी होवू शकतो.

**आरोग्याच्या दृष्टीने कुक्कुटपालनाचे महत्व :**

अन्न ही मानवी जीवनाचे अस्तित्व टिकविण्यास आवश्यक अशी प्राथमिक गरज आहे. शरीराची वाढ होणे, झीज भरुन काढणे, ऊर्जा निर्मिती, कार्यशक्ती याबाबी शरीराने उपयोग केलेल्या अन्नामुळे घडून येतात. त्यामुळे आहारात घेतलेले अन्न

पोषणदृष्ट्या समतोल असावे लागते. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने समतोल आहार या संकल्पनेत दररोज पुरुष व स्रियांना ३० ग्रॅम मांस व ३०ग्रॅम अंडी सेवनामध्ये असावेत, असे स्पष्ट केले आहे. ५० ग्रॅम मांसातून ५५ उष्मांक(कॅलरी) मिळतात तर एका अंड्यातून ७५उष्मांक(कॅलरी) मिळतात. कोंबडीच्या अंड्यातील पोषक घटकांचा विचार करता दुधाच्या खालोखाल अंड्याला सकस आहारात स्थान आहे.

व्यक्तीच्या वजनानुसार ६० किलोच्या व्यक्तीला ६० ग्रॅम प्रोटीन खाल्ले पाहिजे. आज१०० ग्रॅम चिकन मध्ये २६ ग्रॅम प्रथिने आहेत. तसेच एका अंडय़ामध्ये १२ ग्रॅम प्रथिने आहेत. चिकन १६० रुपये प्रति किलो घेतल्यास प्रति ग्रॅम प्रथिनांसाठी ६१ पैसे आणि अंडी पाच रुपयाला घेतल्यास ८३ पैसे असा खर्च येतो. इतक्या स्वस्त प्रमाणात प्रथिने उपलब्ध होतात.

जागतिक भूक नेर्देशांक (Global Hunger Index) २०२१ नुसार जगातील १३५ देशांच्या सर्वेतून ११६ देशांच्या विश्लेषण पहाता भारत २७.५ स्कोअरनुसार १०१ व्या स्थानावर आहे. विशेष म्हणजे भारताचा स्कोअर हा श्रीलंका ६५ व्या स्थानावर १६.० स्कोर, बांगलादेश ७६ व्या स्थानावर१९.१स्कोर, नेपाळ ७६ व्या स्थानावर १९.१ स्कोर, पाकिस्तान ९२ व्या स्थानावर २४.७स्कोर पेक्षाजास्त आहे आणि चीनचा स्कोअर ५ पेक्षा कमी आहे. याचा अर्थ असा भारत हा गंभीर कुपोषण असलेल्या देशांमध्ये मोडतो.

**कुक्कुटपालन आणि महिला सक्षमीकरण:**

केंद्र आणि राज्य सरकारच्या दोन्ही आर्थिक धोरणांनी कृषी विकास वाढविण्यात आणि टिकवून ठेवण्यास मदत केली असली तरी भारतीय ग्रामीण समाजातील लैंगिक असमानतेसह खोलवर रुजलेल्या आर्थिक आणि सामाजिक असमानतेचे पुरेसे निराकरण करण्यात ते सक्षम झाले नाहीत. अलिकडच्या खुल्या आर्थिक सुधारणावादी धोरणांचा महिलांवर नकारात्मक परिणाम झाला आहे आणि आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिमाणांसह लैंगिक असमानता असलेल्या गंभीर पितृसत्ताक, सामाजिक वातावरणात महिलांना आधीच तोंड द्यावे लागत असलेल्या समस्यांमध्ये भर पडली आहे.

महिला या घरातील अन्नसुरक्षेच्या संरक्षक असतात. जेव्हा महिलांकडे उत्पन्नाचे स्रोत असतात तेव्हा त्या त्यातील बहुतांश खर्च त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर आणि पोषणावर करतात. पशुधन आणि कुक्कुटपालन क्षेत्राच्या वाढीच्या आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत महिलांचा लाभदायक सहभाग, उत्पादकता, उत्कृष्टता आणि स्पर्धात्मक फायद्यासाठी महिलांकरिता संस्थात्मक, कायदेशीर आणि तांत्रिक बदलांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

भारतात पशुधन आणि कुक्कुटपालन उत्पादन मोठ्या प्रमाणात महिलांच्या हातात आहे. पशुपालनाचे आणि कुक्कुटपालन बहुतांश उपक्रम स्त्रिया करतात. विशेषतः महिलांचे ग्रामीण अर्थकारणात लक्षणीय सहभाग आणि योगदान असूनही, लक्षणीय लैंगिक असमानता देखील अस्तित्वात आहे.

उत्पादन, प्रक्रिया आणि विपणन यासह पशुधन मूल्य शृंखलेत महिला उद्योजकता विकसित करण्यासाठी विशेष कार्यक्रम सुरू केले पाहिजेत जेणेकरून त्यांना उत्पादन आणि विपणनातील उदयोन्मुख आव्हानांना तोंड देता येईल. कुक्कुट प्रजनन, आरोग्य, खाद्य आणि पोषणव्यवस्थापन आणि विपणन अशा विविध पैलूंमध्ये महिलांचे कौशल्य वाढवण्याची आवशकता आहे. महिलांची उद्योजकता विकसित करणे देखील आवश्यक आहे. सामाजिक उद्योजकता दृष्टीकोन स्वीकारणे आणि गावपातळीवर विशेषतः महिला-केंद्रित कुक्कुटपालन विकास कार्यक्रमांची परिणामकारकता वाढविण्यासाठी पशुवैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि सेवा वितरण प्रणालींमध्ये लैंगिक पूर्वाग्रह सुधारण्याची देखील आवश्यकता आहे.

**कुक्कुटपालनाचीसद्यस्थिती :**

**नीती आयोगाच्या अहवालानुसार स्थिती ($12^{th}$ Plan Report):**

 ISBN: 978-93-5780-325-0

भारत जागतिक पोल्ट्री नकाशावर तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा अंडी (५६ अब्ज अंडी) आणि ५वा सर्वात मोठा पोल्ट्री मांस (२.६ दशलक्ष टन) उत्पादक म्हणून उदयास आला आहे. गेल्या दशकात एकूण कोंबडीच्या संख्येमध्ये वार्षिक ७.३% वाढ नोंदवली गेली आहे. फार्म कोंबडी १२.४% दराने वाढली, तर देशी कोंबडीची वाढ २% इतकी कमी झाली.

देशातील एकूण पोल्ट्री उत्पादनात जवळपास ७०% वाटा संघटित क्षेत्राचा आहे. ब्रॉयलर उद्योगाच्या प्रगतीचा दक्षिणेकडील राज्यांमध्ये चांगलाच प्रभाव आहे, जे एकूण पोल्ट्री उत्पादनात ६०-७०% योगदान देतात. अंडी उत्पादनातील वार्षिक वाढ दर वर्षी अंदाजे ६% आहे. त्याचप्रमाणे, कोंबडीच्या मांस उत्पादनातसरासरी १०% वाढ दिसून आली आहे.

भारतातील थर आणि ब्रॉयलरची सध्याची ताकद अनुक्रमे २३० दशलक्ष आणि २३०० दशलक्ष असल्याचा अंदाज आहे. तथापि, देशात उत्पादित होणाऱ्या अंडींपैकी केवळ ६% अंडी मुख्यतः निर्यातीसाठी प्रक्रिया केलेल्या अंडी उत्पादनांमध्ये रूपांतरित केली जातात. वार्षिक दरडोई उपलब्धता १९६१ मधील ७ अंड्यांवरून २०१० मध्ये ५२ अंड्यांपर्यंत वाढली आहे; आणि पोल्ट्री मांस ०.१६ कि.ग्रॅ. ते २.९६ कि.ग्रॅ.तथापि, सध्याची उपलब्धता पातळी ICMR च्या शिफारशींनुसार १८० अंडी आणि ११ किलो मांस प्रतिवर्षी दरडोई आहे.


रोजगार निर्मिती आणि ग्रामीण उत्पन्न वाढवण्यामध्ये पोल्ट्री क्षेत्राची क्षमता चांगली आहे. देशातील ग्रामीण आणि आदिवासी भागात असंख्य लहान पोल्ट्री पाळणाऱ्यांशिवाय पाच दशलक्षाहून अधिक लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पोल्ट्री क्षेत्रात गुंतलेले आहेत.

नीती आयोगाच्या अहवालानुसार भारतातील २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेशात प्रत्येक राज्य/केंद्रशासित प्रदेशात बहुआयामी गरीब असलेल्या लोकसंख्येची टक्केवारी पाहता असे लक्षात येते की, देशात पहिला क्रमांक बिहारचा लागतो, तेथील गरिबी ५१.९०%आहे. राज्यांमध्ये महाराष्ट्राचा सतरावा क्रमांक लागतो, महाराष्ट्रात१४.८५% गरिबी आहे. पोषण आहाराच्या बाबतीत देशातील बिहारमधील ५१.८८% लोक आणि महाराष्ट्रातील ३६.०९% लोकांना पोषणासाठी पुरेसा आहार मिळत नाही.

**भारतातील कुकुटपालन व्यवसायाची स्थिती:**

**अंडी उत्पादन:**

२०२०-२१ मध्ये देशातील एकूण अंडी उत्पादनाची संख्या १२२.०५ अब्ज आहे.व्यावसायिक कुक्कुटपालनातून एकूण अंडी उत्पादन १०३.२९ अब्ज आहे आणि घरामागील परसदारातील कुक्कुटपालनातून उत्पादन१८.७५ अब्ज आहे. जे एकूण अंड्याच्या उत्पादनात अनुक्रमे ८४.६३% आणि १५.३७% योगदान देते.चीन मध्ये २०२०ला ५९६.५ अब्ज अंडी उत्पादनासह जगातएकूण अंडी उत्पादनाच्या बाबतीत चीनचा पहिला क्रमांक लागतो. भारतात११४.४ अब्ज अंडी उत्पादन होवून भारताचा जगात दुसराक्रमांक लागतो.मागील २०१९-२० च्या तुलनेत या वर्षी २०२०-२१ मध्ये अंडी उत्पादनात ६.७०% वाढ झाली आहे. भारतातील२०२०-२१ मधीलअंड्यांची दरडोई उपलब्धता प्रतिवर्ष ९०अंडी आहे.




*स्त्रोत: Basic Animal Husbandry Statistics-2021, Page No. 14, Graph 2.10*

वरीलआलेख क्र.०१दर्शविते की,१९५१-५२ मध्ये देशातील एकूण अंडी उत्पादन १ अब्ज आठशे बत्तीस दशलक्ष असणारे उत्पादन २०१४-१५ मध्ये ७८.४८ अब्ज नग होते आणि तेव्हापासून अंड्यांचे उत्पादन वाढतच आहे ते २०२०-२१ मध्ये १२२.०५ अब्ज नगांवर पोहोचले आहे. १९५१-५२ मध्ये देशातील दरडोई उपलब्धता प्रतिवर्षी ५ अंडी होती.२०१४-१५ या कालावधीत दरडोई उपलब्धता प्रतिवर्षी ६२अंडी होती. अंड्यांच्या दरडोई उपलब्धतेत सातत्याने वाढ होत आहे. २०२०-२१या वर्षात दरडोई उपलब्धता ९०अंडी प्रतिवर्षावर पोहोचली आहे, जी मागील वर्ष २०१९-२० च्या वार्षिक ८६अंड्यांपेक्षा चार गुणांनी वाढली आहे.

**देशात अग्रभागी असलेल्या राज्यांतील दरडोई अंडी उपलब्धता**

**२०१४-१५ ते २०२०-२१**(संख्यावार्षिक)

| अ.क्र. | राज्य | २०१५ १६- | २०१६ १७- | २०१७ १८- | २०१८ १९- | २०१९ २०- | २०२० २१- |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | आंध्रप्रदेश | २७८ | ३०८ | ३४४ | ३८० | ४२० | ४७५ |
| ०२ | तमिळनाडू | २१८ | २२४ | २३२ | २५० | २६५ | २६५ |
| ०३ | तेलंगणा | ३१० | ३२४ | ३४५ | ३७० | ३९८ | ४२३ |
| ०४ | पंजाब | १५३ | १६४ | १७८ | १८९ | १८९ | १८८ |
| ०५ | कर्नाटक | ७५ | ७९ | ८६ | ९२ | १०१ | ११५ |
| ०६ | हरियाणा | १८२ | १९० | २०० | २१४ | २३१ | २५० |
| ०७ | अंदमान-निकोबार | २५४ | २६३ | २७३ | २८८ | २९९ | ३४१ |


 ISBN: 978-93-5780-325-0

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | महाराष्ट्र | ४५ | ४६ | ४८ | ४९ | ५२ | ५२ |
| ०९ | भारत | ६५ | ६८ | ७३ | ७९ | ८६ | ९० |

*स्रोत: महाराष्ट्राचीआर्थिक पाहणी २०२१-२०२२*

राज्यवार विश्लेषण विचारात घेता, २०१४-१५ ते २०२०-२१ या कालावधीत, केरळ सारखी राज्ये वगळता सर्व राज्यांमध्ये अंडी उत्पादनात सातत्याने वाढ झाली आहे.२०२०-२१ अखेर दरडोई अंडी उपलब्धता आंध्रप्रदेश ४७५, तेलंगण ४२३, अंदमान-निकोबार ३४१, तामिळनाडू २६५, हरियाणा २५० आणि महाराष्ट्र फक्त ५२.

देशातील एकूण अंडी उत्पादनाच्या तुलनेत अंडी उत्पादनातील राज्यवार वाटा पाहता अंड्याचा सर्वात मोठा उत्पादक आंध्र प्रदेश आहे जो देशातील एकूण अंडी उत्पादनापैकी २०.४५% उत्पादन करतो आणि त्यानंतर तामिळनाडू १६.४९% उत्पादन करतो. देशातील एकूण अंडी उत्पादनात १२.९८% वाटा असलेले तेलंगणा हे देशातील तिसरे सर्वात मोठे अंडी उत्पादक राज्य आहे. देशभरातील एकूण अंडी उत्पादनात ५% पेक्षा जास्त योगदान देणारी इतर काही राज्ये म्हणजे पश्चिम बंगाल, कर्नाटक, हरियाणा आणि महाराष्ट्र.





स्रोत: *Basic Animal Husbandry Statistics-2021, Page No. 14, Graph 2.14*

वरीलआलेख क्र.2 मध्ये दर्शविल्यानुसार ०९ राज्यांनी राष्ट्रीय विकास दर (६.७०%)ओलांडला आहे.सिक्कीम, कर्नाटक, आंध्र प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश, हरियाणा, बिहार, पश्चिम बंगाल आणि तेलंगणाच्या बाबतीत अंडी उत्पादनात लक्षणीय वाढ दिसून येते. २०२०-२१ मध्ये अंडी उत्पादनाच्या बाबतीत ०९ राज्यांनी ७% पेक्षा जास्त वाढ नोंदवली आहे. महाराष्ट्रातील वाढीचा दर फक्त ०.५०% असल्याने राष्ट्रीय विकास दराच्या तुलनेत महाराष्ट्र खूपच मागे असल्याचे दिसून येते.

व्यावसायिक कुक्कुटपालनातून एकूण अंडी उत्पादन १०३.२९ अब्ज आहे आणि घरामागील परसदारातील कुक्कुटपालन १८.७५ अब्ज आहे. जे एकूण अंड्याच्या उत्पादनात अनुक्रमे ८४.६३% आणि १५.३७% योगदान देते. देशी संवर्गातील कोंबडी आणि देशी बदक म्हणजेच ग्रामीण भागातील शेतकऱ्याने आपल्या परसदारी केलेल्या जोडधंद्यातून केलेले उत्पादन आहे. कोणत्याही तांत्रिक सहाय्याशिवाय आणि कमी भांडवलात, कमी मनुष्यबळात केलेल्या या व्यवसायातून खूप मोठी मदत शेतकऱ्यांना होत असते.

**कुक्कुटपालनातून मांस उत्पादन:**

देशातील एकूण मांस उत्पादन ८.८० दशलक्ष टन आहे.एकूण मांस उत्पादनाच्या बाबतीत भारत जगात ८ व्या क्रमांकावर आहे.मागील २०१९-२० वर्षीच्या तुलनेत २०२०-२१ मध्ये मांस उत्पादनात २.३०% वाढ झाली आहे.कुक्कुट मांस उत्पादनवाढ मागील वर्षीच्या तुलनेत २.९८%इतकीकमी झाली आहे.महाराष्ट्र (१२.६०%), उत्तर प्रदेश (११.७९%), पश्चिम बंगाल (११.३०%), आंध्र प्रदेश (१०.८४%) आणि तेलंगणा (१०.४६%) ही शीर्ष ५मांस उत्पादक राज्ये आहेत. कुक्कुटपालनातून मांस उत्पादनाचा हिस्सा देशातील एकूण मांस उत्पादनात ५७% योगदान देतात. देशातील एकूण मांस उत्पादनाच्या तुलनेत मांस उत्पादनातील सर्वात मोठे मांस उत्पादक राज्य हे महाराष्ट्र आहे.




वरील आलेख क्र.३ मध्ये दर्शविल्यानुसार २०१४-१५ मध्ये देशातील एकूण मांस उत्पादन ६.६९ दशलक्ष टन होते आणि तेव्हापासून मांसाचे उत्पादनात लक्षणीय सुधारणा झाली आहे आणि ते २०२०-२१ मध्ये ८.८० दशलक्ष टनांवर पोहोचले आहे. २०१४-१५ या कालावधीत दरडोई उपलब्धता ५.३२ किलो प्रतिवर्ष होती. मांसाच्या दरडोई उपलब्धतेत सातत्याने वाढ होत आहे. २०२०-२१ या वर्षात दरडोई उपलब्धता ६.५२ कि.ग्रॅ.वार्षिक वर पोहोचली आहे, जी मागील वर्ष २०१९-२० च्या ६.४५ कि.ग्रॅ.वार्षिक वरून ०.०७ अंकांनी वाढली आहे.

२०२०-२१ मध्ये देशभरात उत्पादित झालेल्या एकूण मांसामध्ये गाय, म्हैस, मेंढी, शेळी, डुक्कर आणि कुक्कुट यांच्या मांस उत्पादनाचे योगदान पाहता, जवळजवळ ५०.८४% मांस उत्पादनात पोल्ट्रीचे योगदान आहे. देशातील एकूण मांस उत्पादनात म्हैस, शेळी, मेंढी, डुक्कर आणि गुरे यांचा वाटा अनुक्रमे १७.९७%, १३.७८%, १०.०४%, ४.०६% आणि ३.३१% आहे.

देशातील एकूण मांस उत्पादन ८७९७.९१ हजार टन आहे. त्यापैकी ४४७२.६९ टन म्हणजे ५०% पेक्षा जास्त उत्पादन हे कुक्कुटपालन व्यवसायातून मिळते. याशिवाय शेळी प्रजाती आणि मेंढ्यांच्या प्रजातीतील मांस उत्पादनाच्या तुलनेत कुक्कुटपालन व्यवसायातून ४७% उत्पादन जास्त मिळते.

**कुक्कुटपालन व्यवसायाच्या विकासासाठी योजना:**

**राष्ट्रीय कृषी विकास योजना:**

परसदारातील कुक्कुटपालनास उपयुक्त अशा केंद्रीय पक्षी अनुसंधान केंद्र बरेली या संस्थेच्या मान्यताप्राप्त गिरीराज, वनराज, कडकनाथ इत्यादी जातीच्या पिलांची निर्मिती लहान व मध्यम शेतकऱ्यास त्यांच्या ठिकाणीच करणे शक्य व्हावे याकरिता महिला बचत गट वैयक्तिक लाभार्थीस या

 ISBN: 978-93-5780-325-0

योजनेअंतर्गत हॅचर कम सेटर संयंत्रांचे अनुदानावर वाटप करण्यात येते. योजनेतून खुल्या प्रवर्गातील लाभार्थींना प्रकल्प खर्चाच्या ५०% मर्यादित शासकीय अनुदान देण्यात येते. तर अनुसूचित जाती जमातींच्या लाभार्थींना प्रकल्प खर्चाच्या ७५% मर्यादेपर्यंत शासकीय अनुदान मिळते.

केंद्रीय योजनांव्यतिरिक्त, अनेक केंद्रीय प्रायोजित योजना (CSS) पूर्वीच्या योजनांमध्ये अस्तित्वात आहेत. या योजनांनी पोल्ट्री क्षेत्राच्या विशेषत: ग्रामीण पोल्ट्रीच्या वाढीस मोठा हातभार लावला आहे.

देशातील ग्रामीण/आदिवासी भागात मॉलधारक कुक्कुटपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारांना नाबार्डकडून पुनर्वित्त देऊन अनुदान देण्यात आले. या योजनेमुळे मोठ्या संख्येने गरीब कुटुंबांना त्यांचे उत्पन्न आणि पोषण सुरक्षा वाढवण्यासाठी फायदा झाला आहे. विद्यमान प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी तूट असलेल्या राज्यांमध्ये व्यावसायिक कुक्कुट उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी १२ व्या योजनेत या योजनेचा विस्तार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. केंद्रीय पोल्ट्री डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन पोल्ट्री स्टॉकसाठी दर्जेदार पिल्ले पुरवून पोल्ट्रीच्या विकासाला चालना देत आहेत.याशिवाय, महिला आणि दुर्बल घटकांच्या गट निर्मितीवर विशेषभर देऊन स्वरंजयंती ग्राम स्वरोजगार योजना (SGSY)अंतर्गत ग्रामीण कुक्कुटपालनांनाही मदत उपलब्ध करून दिली जात आहे.

१२ व्या योजनेत व्यावसायिक स्तरामध्ये सरासरी ७% वाढीचे लक्ष्य होते.व्यावसायिक ब्रॉयलरमध्ये दरवर्षी ११% आणि ग्रामीण पोल्ट्रीमध्ये ३%. पोल्ट्री उत्पादनांची सतत वाढणारी देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी आणि निर्यात व्यापाराला चालना देण्यासाठी ग्रामीण आणि व्यावसायिक दोन्ही क्षेत्रांना पाठिंबा मिळणे आवश्यक मानले आहे.

अंडी आणि मांस उत्पादनांच्या प्रक्रियेस प्रोत्साहन देण्यासाठी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयअंतर्गत राष्ट्रीय मांस आणि कुक्कुट प्रक्रिया मंडळाची स्थापना करण्यात आली. प्राथमिक उत्पादनापासून ते ग्राहकांपर्यंत सर्व मांसाशी संबंधित समस्यांचा समावेश करण्यासाठी मंडळाची व्याप्ती विस्तृत केली जाऊ शकते. यापुढे मांसाच्या समस्या सोडवण्यासाठी राज्य मांस विकास मंडळांची स्थापना केली जाऊ शकते.दर्जेदार मांस आणि मांस उत्पादनांचे उत्पादन सुनिश्चित करण्यासाठी आणि प्रदूषणापासून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्रस्तावित इतर योजना महत्त्वपूर्ण आहेत.

**कुक्कुटपालनातील संभावना:**

वाढती लोकसंख्या, वाढते उत्पन्न आणि जलद शहरीकरण यामुळे पशुधन उत्पादनांची मागणी वाढत आहे. आणि कृषी-अन्न बाजाराच्या वाढत्या जागतिकीकरणामुळे, पशुधन उत्पादक आता जागतिक स्पर्धेला सामोरे जात आहेत. गुणवत्ता आणि कार्यक्षमतेत शाश्वत आणि सर्वांगीण सुधारणांद्वारे कृषी-स्तरावरजागतिक पशुधन आणि कुक्कुटपालन उत्पादन बाजारपेठेत भारताला एक अग्रगण्य स्पर्धक बनवले आहे.

कुक्कुटपालन हा अत्याधुनिक वैज्ञानिक आणि तांत्रिक ज्ञानाचा उद्योग बनला आहे. गेल्या ३० ते ३५ वर्षांत मोठ्या शहरांमध्ये अंडी आणि पोल्ट्रीची मागणी झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे कुक्कुटपालनाचा व्यवसाय झपाट्याने वाढत आहे. २०२१ मध्ये भारतीय पोल्ट्री मार्केटची उलाढाल १,७०,८०० कोटी इतकी होती. २०२७ पर्यंत ही उलाढाल ३,१७००० कोटींवर जाण्याची शक्यता IMARC समुहाने व्यक्त केली आहे. ही वाढ एकूण १०.५० टक्क्यांपर्यंत असेल.

व्यावसायिक तत्त्वावर अंडी उत्पादनासाठी केल्या जाणाऱ्या कुक्कुटपालन व्यवसायास 'लेयर' तर मांस उत्पादनासाठी केलेल्या कुक्कुटपालनास 'ब्रॉयलोर' म्हणतात.ग्रामीण भागात परसबागेतील कोंबडी पालनास अत्यंत कमी खर्च लागतो. सुधारित जातीच्या कोंबड्या सशक्त असून वातावरणातील बदलाला सहसा बळी पडत नाहीत. देशी कोंबड्यांसारख्या दिसणाऱ्या व तेवढ्याच काटक अशा परसदारातील कोंबड्यांच्या वनराजा, गिरीराजा, ग्रामप्रिया, कृषीब्रोव, स्वर्णधारा इत्यादी जाती पाहायला मिळतात. स्वच्छ पाणी, योग्य आहार आणि वेळापत्रकानुसार लसीकरण पुरवल्यास अंडी व मांसाची कमतरता भरून काढण्यासाठी परसातील कोंबडी पालन हा चांगला पर्याय आहे.देशी जातीच्या पक्षांऐवजी विकसित जातीचे

पक्षी परसबागेत वाढविल्यास ग्रामीण भागातील अंडी व मांसाचे उत्पादन वाढून ग्रामीण भागातील भूमिहीन गरीब शेतमजूर यांच्या अन्नातील प्रथिनांची गरज भागवून कुपोषण थांबविण्यास आणि अर्थार्जनासाठी मदत होईल.

**कुक्कुटपालन आणि अंतरराष्ट्रीय व्यापार:**

बहुतेक देशांमध्ये, पोल्ट्री उत्पादन मुख्यतः घरगुती वापरासाठी केले जाते. अन्न आणि कृषी संस्था, सांख्यिकी(FAOSTAT)नुसार, २००७ मध्ये केवळ १२% कुक्कुट मांस आणि २%  अंड्यांचा जागतिक बाजारात व्यापार झाला. ब्राझील आणि युनायटेड स्टेट्स हे पोल्ट्री मांसाचे दोन सर्वात मोठे निर्यातदार आहेत.

**भारतातील पोल्ट्री उत्पादनांची आयात:**

भारतातील पोल्ट्री उत्पादनांची आयात सन २०१९-२० मध्ये ७९७.५५ मे.टन होते. सन २०२०-२१ मध्ये २९६.७७ मे.टन आणि २०२१-२२ मध्ये ४१७.८३ मे.टन होते. कोरोना प्रादुर्भावामुळे तसेचपोल्ट्री उत्पादनांच्या सेवनाबाबत निर्माण झालेले समज-गैरसमज आणि देशात वाढलेले पोल्ट्री उत्पादन यामुळे आयात कमी झालेली पहावयास मिळते.

**भारतात आयात केल्या जाणाऱ्या पोल्ट्री उत्पादनातील**

**प्रमुख ५ देशांचे योगदान (२०२१-२०२२)**

| **निर्यात करणारे देश** | **संख्या मे.टन** | **किंमत रु.लाखात** |
|---|---|---|
| यु.एस.ए | ६०.०६ | १८४०.७१ |
| फ्रान्स | ४८.७ | ९३७.०१ |
| नेदरलँड | १६.९२ | २८४.२४ |
| स्पेन | ७.६६ | २८३.८३ |
| जर्मनी | ६८.४६ | २५५.०९ |
| **प्रमुख ५ देशांची एकूण** | २०१.८ | ३६००.८८ |
| **इतर देश** | २१६.०३ | ३८४.७८ |
| **एकूण** | **४१७.८३** | **३९८५.६६** |
| **प्रमुख ५ देशांचे % प्रमाण** | ४८.३३ | ९०.३४ |

स्त्रोत: https://agriexchange.apeda.gov.in/product_profile/exp_f_india.aspx

सन २०२१-२२ मध्ये ४१७.८४ मे.टन पोल्ट्री उत्पादनांची आयात झालेली पहावयास मिळते आणि यासाठी तब्बल ३९ कोटी ८५ लाखांपेक्षा जास्त रक्कम खर्च केली गेली.

**भारतातील पोल्ट्री उत्पादनांची आयात-निर्यात**

| वर्ष | २०१९-२० | | २०२०-२१ | | २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या मे.टन | रु.लाखात | संख्या मे.टन | रु.लाखात | संख्या मे.टन | रु.लाखात |
| निर्यात | ३५०८१७.७९ | ५७४५८.३४ | २५५६८६.९४ | ४३५५२.९२ | ३२०२४०.४५ | ५२९८०.३१ |
| आयात | ७९७.५५ | ४०४४.०७ | २९६.७७ | २५७४.७७ | ४१७.८४ | ३९८५.६५ |

स्रोत: https://agriexchange.apeda.gov.in/product_profile/exp_f_india.aspx

सन २०००-२००१ मध्ये १४१५०.२२ मे.टन निर्यात होवून ८०२८.२६ लाखांचे निर्यातमूल्य प्राप्त झाले. २०२१-२२ मध्ये ३२०२४०.४५ मे.टन निर्यात होवून ५२९८०.३१ लाखांचे निर्यातमूल्य प्राप्त झाले. सन २०००-२००१ च्या तुलनेत सन २०२१-२२ मध्ये ८४.८५% निर्यात मूल्यात वाढ झाल्याचे निदर्शनास येते.

**कुक्कुटपालन व्यवसायातील प्रमुख अडचण:**

शेतीमध्ये पूरक उत्पन्नासाठी आणि इतरत्र स्वयं-रोजगारासाठी कुक्कुटपालन हे एक सक्षम क्षेत्र असूनही त्याचा पुरेसा विकास झालेला नाही. यामधील मुख्य अडचण ही आहे की, हा व्यवसाय बहुतांशी खेड्यांमध्ये दुय्यम स्वरूपात केला जातो. त्यांची आरोग्य निगा, लसीकरण, रोग, इत्यादींचा फारसा विचार केला जात नाही. उन्हाळयाच्या काळात कोंबड्यांची अंडी बऱ्याच प्रमाणात खराब होतात. कारण त्यांच्या संग्रहणांची किंवा त्वरित स्थानांतराची सोय नसते. ग्रामीण भागात कुक्कुटपालन व्यवसायाच्या विकासासाठी योग्य मार्गदर्शन न मिळणे, तसेच विकासाच्या पुरेशा सोयी उपलब्ध नसणे यासुद्धा महत्वपूर्ण अडचणी आहेत.

**निष्कर्ष:**

१. संशोधन अभ्यासातील गृहीतकानुसार व प्राप्त तथ्य विश्लेषणातून हा निष्कर्ष निघतो की, कुक्कुटपालन व्यवसाय अर्थव्यवस्थेतील एक महत्वपूर्ण व्यवसाय आहे. कुक्कुटपालन व्यवसायात रोजगार व उत्पन्न वाढीच्या मोठ्या संधी आहेत. ग्रामीण विकासामध्ये कुक्कुटपालन व्यवसायाचे अमुलाग्र योगदान आहे.

२. राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय स्तरावर दिवसेंदिवस वाढत असलेली मांस आणि अंड्याची मागणी पुरविण्यासाठी भरतात विशेषतः ग्रामीणभागामध्ये प्रचंड क्षमता आहे. यामुळे देशाला मोठ्याप्रमाणात परकीय चलन मिळवून देण्यामध्ये कुक्कुटपालन व्यवसाय विशेष महत्वाचा ठरू शकतो. भारतातील पोल्ट्री उत्पादनात आयातीपेक्षा निर्यात जास्त आहे.

३. कुक्कुटपालन क्षेत्राच्या वाढीच्या आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत महिलांचा लाभदायक सहभाग, उत्पादकता, उत्कृष्टता आणि स्पर्धात्मक फायद्यासाठी महिलांना संस्थात्मक, कायदेशीर आणि तांत्रिक बदलांमध्ये सामावून घेणे शक्य आहे.

४. देशातील एकूण पोल्ट्री उत्पादनात जवळपास ७०% वाटा संघटित क्षेत्राचा आहे.रोजगार निर्मिती आणि ग्रामीण उत्पन्न वाढवण्यामध्ये पोल्ट्री क्षेत्राची क्षमता चांगली आहे.देशातील ग्रामीण आणि आदिवासी भागात असंख्य लहान पोल्ट्री पाळणाऱ्यांशिवाय पाच दशलक्षाहून अधिक लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पोल्ट्री क्षेत्रात गुंतलेले आहेत.

५. देशातील अंडी व मांस उत्पादन आणि दरडोई उपलब्धतेत सातत्याने वाढ होत आहे. महाराष्ट्रातीलअंडी वाढीचा दरराष्ट्रीय विकास दराच्या तुलनेत खूपच मागे असल्याचे दिसून येते.

कुक्कुटपालन व्यवसायाच्या वाढीसाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी काही धोरणात्मक निर्णय घेवून योजना कार्यान्वित केल्या आहेत. तथापि प्रत्येक राज्यात तसेच खेडी आणि अदिवशी पाड्यांमध्ये प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही.

६. देशभरात उत्पादित झालेल्या एकूण मांसामध्ये ५० % पेक्षा जास्त उत्पादन कुक्कुटपालन व्यवसायातून होते.

६. ग्रामीण भागात पोल्ट्री उत्पादनआणि प्रक्रिया केलेल्या उत्पादनांची मागणी यामध्ये प्रादेशिक असमतोल कायम आहे. त्यांच्या खराब उत्पादन कार्यक्षमतेमुळे पर्यायी कुक्कुट प्रजातींना अंतरराष्ट्रीय बाजार स्वीकार्यता मिळाली नाही.

७. विकसनशील देशांमध्ये विशेषतः ग्रामीण भागामध्ये कुक्कुटपालनाची मोठी भूमिका आहे. व्यावसायिक पोल्ट्री उद्योग मोठ्याप्रमाणात रोजगार पुरवू शकतो आणि अशा व्यवसायाची झपाट्याने वाढ करणे शक्य आहे.

८. कोंबडीचे मांस आणि अंडी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत, तुलनेने स्वस्त आहेत आणि आवश्यक पोषक तत्वांची कमतरता भरून काढण्यासाठी, विशेषत: गरीब लोकांच्या मदतीसाठी ते अत्यंत महत्वाचे ठरू शकते. ग्रामीण लोकांच्या आहारात कर्बोदकांमधे भरपूर असतात परंतु प्रथिने कमी असतात अशा स्थितीत उच्च दर्जाची प्रथिने प्रदान करण्यासाठी घरामागील देशी कुक्कुटपालन अत्यंत महत्वाचे आहे.

९. जागतिक लोकसंख्या वाढ आणि दरडोई वापर वाढल्यामुळे पोल्ट्री आणि पोल्ट्री उत्पादनांची जागतिक मागणी वाढतच राहील. वाहतूक, पायाभूत सुविधा आणि विपणन नेटवर्कमधील सुधारणांमुळे व्यापार देखील वाढेल. हे घटक आणि वेगाने बदलणारे नियम आणि उच्च-उत्पन्न असलेल्या देशांमध्ये अन्न सुरक्षेसाठी वाढणारी मानके, कमी आणि मध्यम-उत्पन्न असलेल्या देशांसाठी आव्हाने आणि संधी दोन्ही निर्माण करतात.

१०. भारतामध्ये निर्याताभिमुख युनिट्सनी अत्याधुनिक तंत्रज्ञानासह मोठ्या प्रयोगशाळा आणि मांस प्रक्रिया संयंत्रांच्या स्थापनेत गुंतवणूक वाढत आहे. तथापि भारतातील मांसाची असलेली मागणी आणि कुक्कुटपालन उद्योगामध्ये असलेली उच्च संभवनीयता विचारात घेता अद्याप खूप मोठ्याप्रमाणात गुंतवणूक वाढणे आवश्यक आहे.

११. स्वच्छ, सुरक्षित आणि स्वच्छ मांस आणि मांस उत्पादनांसाठी भारतीय ग्राहकांची पसंती बदलत आहे, वाढत आहे. याचा विचार होवून प्रामुख्याने कुक्कुटपालन उत्पादन, साठवणूक केंद्रे, प्रक्रिया केंद्रे यासाठी ग्रामीण भागात गुंतवणूक वाढणे आवश्यक आहे.

१२. पशुधन विकास नियोजनासाठी विश्वसनीय आणि वेळेवर आकडेवारीची उपलब्धता महत्त्वाची आहे परंतु पशुधन क्षेत्राच्या अनेक पैलूंवर अशा माहितीची कमतरता आहे. असे असले तरी, आता दोन मुख्य कारणांसाठी विश्वसनीय आकडेवारीची गरज ओळखली जाते. प्रथम, अर्थव्यवस्था जसजशी वाढत जाईल आणि उत्पन्न वाढेल, तसतसे पशुधनाचे सापेक्ष महत्त्व - दूध, मांस, कुक्कुटपालन आणि त्यांची प्रक्रिया केलेली उत्पादने - सरासरी भारतीय आहारात आणखी वाढ होणार आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील योगदानाच्या दृष्टिकोनातून, या क्षेत्राचा वाटा देखील कालांतराने वाढला आहे आणि म्हणूनच, पशुधन क्षेत्राचे अचूक आणि विश्वासार्ह अंदाज महत्त्वपूर्ण ठरतात. दुसरे म्हणजे, जागतिकीकरणाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आपल्या पशुधन उत्पादन प्रणालीच्या सर्व पैलूंवरील वास्तवाचे सर्वसमावेशक आणि विश्वासार्ह ज्ञान असणे अत्यावश्यक आहे.

**शिफारशी:**

१. सरकारी योजनांतील उणीवा दूर करून, तसेच ग्रामीण भागात रोजगार संधी उपलब्ध करून देण्याच्या व महिलांचे सशक्तीकरण करण्याच्या उद्देशाने सुरू केलेले बचत गटासारखे पर्याय देखील कुक्कुटपालन व्यवसाय चालविण्यासाठी ग्रामीण विकासाच्या दृष्टीने प्रभावी ठरतील. शासकीय योजनांचा प्रसार, प्रचार आणि अंमलबजावणी काही काही राज्यांमध्ये हे आणखी मजबूत करणे आवश्यक आहे.

२. शहरी भागात विशेषतः ऑरगॅनिक (organic) म्हणजेच नैसर्गिक रित्या हानिकारक औषधे, केमिकल विरहीत उत्पाद केलेल्या अन्न घटकांना प्रचंड मागणी वाढत आहेआणि अशा अन्नोत्पादनांना किंमतदेखील अतिशय चांगली मिळते. त्यासाठी शेतकरी गट एकत्र येऊन डी-मार्ट, रिलायन्स मार्ट अशा व्होलसेलर सोबत करार करण्याचा प्रयत्न करायला हवा.

३. पोल्ट्री व्हेंचर कॅपिटल फंड योजनेचे चांगले परिणाम दिसून आले आहेत. याचा जास्तीत जास्त लोकांना लाभ मिळवून देण्यासाठी लक्ष्य गट तसेच अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सींमध्ये व्यापक प्रचार आणि जागरूकता निर्माण करण्यावर जोर देऊन योजना पुढे प्रभावीपणे चालू ठेवण्याची गरज आहे.

४. लहान आणि मध्यम कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी पुरेशा रेफ्रिजरेटेड वाहतूक/कोल्ड स्टोरेज सुविधांसह मूल्य-साखळीसह पोल्ट्री उत्पादनांच्या गुणवत्तेची हमी देण्यासाठी कार्यक्षम विपणन नेटवर्कची यंत्रणा अधिक मजबूत केली पाहिजे.

 ISBN: 978-93-5780-325-0

५. अन्न सुरक्षा आणि मानक कायद्यांतर्गत मे, २०११ मध्ये अधिसूचित केलेल्या नवीन नियमांमध्ये दर्जेदार आणि सुरक्षित मांस उत्पादन करण्यासाठी उद्योगाचे संपूर्ण आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. नवीन प्रस्तावित अन्न सुरक्षा नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अन्न सुरक्षा आणि मांसाच्या गुणवत्तेच्या पैलूंबद्दल लोकांमध्ये जागरूकता करण्याची गरज आहे.

६. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय जातीय मांस उत्पादनांनाही मोठी मागणी आहे. सार्वजनिक खाजगी भागीदारी मोडमध्ये विशेष प्रक्रिया केलेले मांस युनिट, प्रस्तुतीकरण आणि उच्च मूल्याचे उप-उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी योग्य प्रोत्साहन दिले जावे. देशातून जास्तीजास्त निर्यातक्षम पोल्ट्री उत्पादन वाढीसाठी अनुषंगिक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

७. पशुधन उत्पादनांची वेगाने वाढणारी मागणी महिलांच्या सक्षमीकरणासाठी संधी निर्माण करते. तथापि, याचा उपयोग करण्यासाठी योग्य धोरणे आणि संस्थात्मक व्यवस्थेद्वारे मूल्य साखळीत स्त्रियांना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करणे आवश्यक आहे.

८. भारतातील गरिबी/दारिद्र्य विचारात घेता देशाच्या लोकसंख्येतील तरुणांची संख्या उत्पादक कार्यासाठी मानवी श्रम उत्पादक करावयाचे असतील तर श्रमिक शारीरक आणि मानसिकदृष्ट्या सशक्त करण्यासाठी पोषण आहाराची आवश्यकता आहे. पुरेसा पोषण आहार निम्न उत्पन्न गटातील बहुसंख्य लोकसंख्येला मिळणे कठीण आहे. यासाठी सरकारने स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून अंडी, मांस अशा पोषण घटकांचा पुरवठा केल्यास श्रमशक्ती विकसित होण्याबरोबरच कुक्कुटपालन व्यवसायाला गती मिळून रोजगाराच्या संधी मोठ्याप्रमाणात वाढू शकतात. सहकारी संस्थांच्या माध्यमातून कुक्कुटपालन व्यवसाय अतिशय पद्धतशीर आणि नियोजनपूर्वक चालविणे शक्य आहे.

९. रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी देशातील संघटीत पोल्ट्री क्षेत्राबरोबर असंघटीत पोल्ट्री क्षेत्रासाठी पायाभूत सोयी-सुविधा आणि विशेष योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे. याकरिता असंघटीत क्षेत्राची आकडेवारी व संपूर्ण माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे.

स्रोत:

१.https://www.statista.com/statistics/263971/top-10-countries-worldwide-in-egg-production/

२.www.globalhungerindex.org/india.html

३. Per capita consumption of meat worldwide 2019-2031, by regionhttps://www.statista.com

४. https://ourworldindata.org/meat-production

५. https://agriexchange.apeda.gov.in/product_profile/exp_f_india.

६. https://www.internationalegg.com

७. Department of Animal Husbandry and Dairying, Basic Animal Husbandry Statistics- 2021

८. Report of the Working Group on Animal Husbandry & Dairying 12th Five Year Plan (2012-17)

९. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२१-२०२२

१०. मराठी विश्वकोश